महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : १६९ वा | दिनांक : ०७/०४/२०२५ | वार : सोमवार

## मुस्लिमांच्या जमिनी झाल्या, आता ख्रिश्चनच्या ताब्यात घेतील - जितेंद्र आव्हाड



**मुंबई** : वक्फ सुधारणा विधेयकाला लोकसभेत आणि राज्यसभेत मिळाल्यानंतर राष्ट्रपतींनीही त्यावर सही केली आहे. त्यामुळे आता वक्फ सुधारणा विधेयकाचा कायदा झाला आहे. यावरून राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी एक ट्विट केले आहे. हे ट्विट सध्या मोठ्या चर्चेचा विषय बनले आहे. या ट्विटमधून जितेंद्र आव्हाड यांनी भाजपवर निशाणा साधला.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मुखपत्र 'ऑर्गनायझर' नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या अंकात, ख्रिश्चन धर्मियांकडील जमिनीचा मुद्दा उचलला तसेच ही जमीन वक्फपेक्षा अधिक असल्याचे सदर अंकातील लेखामध्ये नमूद केले. वक्फच्या ताब्यात असलेल्या जमिनी या त्यांच्या पूर्वजांच्या आणि दान-धर्मातून मिळालेल्या जमिनी आहेत. त्या कुणा एका मुस्लीम इसमाच्या किंवा एका संस्थेच्या मालकीच्या नव्हत्या. वक्फ या शब्दाचा अर्थच मूळात दान असल्याने या सर्व जमिनी दानातून आल्याचे स्पष्ट होत आहे.

भारतभर ख्रिश्चन धर्मियांकडे अनेक जमिनी आहेत. या जमिनी चर्चच्या ताब्यात आहेत अन् हे कोणालाही मान्य करावेच लागेल की, ख्रिश्चन धर्मियांनी वैद्यकीय आणि शैक्षणिक क्षेत्रात अभूतपूर्व काम केले आहे. भारतभर त्यांच्या शैक्षणिक संस्था पसरल्या आहेत. मला सांगायला अभिमान वाटतो की, मी देखील एका ख्रिश्चन संस्थेच्या शाळेतच शिक्षण घेतले आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुखपत्रात ख्रिश्चन धर्मियांकडील जमिनीचा विषय मांडल्यानंतर पहिला आवाज केरळात उचलला गेला आहे. त्यानंतर दिल्लीत बोंबाबोंब सुरू झाल्यावर ऑर्गनायझरने लेखातील तो भाग वगळला. तरीही त्यांच्या मनातील दुजाभाव आणि विष हे काही लपून राहिलेले नाही.

गोळवलकर यांनी आपल्या " बंच ऑफ थॉटस" आणि "नेशनहूड आयडेंटिफाइड" पुस्तकात ख्रिश्चन आणि मुस्लिमांना देशाचे नागरिकत्व देण्याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण करून त्यांना दुय्यम नागरिकत्व देण्याबाबत केले होते. ज्यावेळेस वक्फ बद्दल राज्यसभा आणि लोकसभेत चर्चा सुरू होती. त्यावेळेस हा लेख प्रसिद्ध करण्यात आला. त्यामुळे कुणी काहीही म्हटले तरी मातृसंस्था आणि भाजपचे खरे मार्गदर्शक हे गोळवलकर हेच आहेत. अन् त्यांच्या पुस्तकातच हे सर्व नमूद करण्यात आले आहे. कालांतराने ख्रिश्चन धर्मियांकडील जमिनी काढून घेण्यात येणार, ही न लपलेली गोष्ट आहे.1

## रामाचे नाव घेण्याची भाजपची पात्रता नाही उद्धव ठाकरेंचा घणाघात



**मुंबई** : राम जसे वागले, तसे वागण्याचा प्रयत्न करावा, इतक्याच त्यांना शुभेच्छा, असा टोला उद्धव ठाकरे यांनी भाजपला स्थापना दिनाच्या शुभेच्छा देताना लगावला. रामाचे नाव घेण्याची भाजपच्या लोकांची पात्रता नाही. प्राण जाए, पर वचन न जाए असे सरकारला सांगण्याची गरज आहे, अशी टीका ठाकरे यांनी शेतकरी कर्जमाफीच्या मुद्द्यावरून सरकारवर केली.

राम नवमी निमित्त शिवसेना ठाकरे गटाकडून शिव संचार सेनेच्या लोगोचे अनावरण करण्यात आले. उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत मातोश्रीवर हा अनावरण कार्यक्रम पार पडला. यावेळी बोलताना उद्धव ठाकरे यांनी भाजपवर जोरदार निशाणा साधला. भाजपचा आजचा वर्धापन दिन हा तिथीप्रमाणे, तारखेप्रमाणे की त्यांच्या सोयीप्रमाणे आहे. हे आधी सांगा. राम नवमी हा तुमच्या पक्षाचा स्थापना दिवस असेल, तर प्रभू रामचंद्र जसे वागले होते, तसे वागण्याचा प्रयत्न करा, या एवढ्याच माझ्या त्यांना शुभेच्छा आहेत, असे उद्धव ठाकरे म्हणाला.

वक्फ बिलावरून आम्ही आमची भूमिका मांडली आहे. वक्फ विधेयकावरून आम्ही कोर्टात जाणार नाहीत. काँग्रेस आणि इतर पक्ष कोर्टात जाणार असतील, तर त्यांना जाऊ द्या. आम्हाला जे म्हणायचे होते, ते आम्ही सांगितले आहे, असे उद्धव ठाकरे म्हणाले.

निवडणूक जिंकण्यासाठी भाजपने लाडकी बहीण योजनेला वाढीव पैसे देऊ बोलले होते. शेतकऱ्यांना कर्जमाफीचे आश्वासन दिले होते. मात्र, आता प्राण जाए पर वचन न जाए असे सरकारला सांगण्याची गरज आहे. कारण त्यांनी लोकांना फसवणून मते घेतली, हे आता उघड झालेले आहे. त्यामुळे सरकारच्या लोकांची रामाचे नाव घेण्याची पात्रता नाही, अशी टीका उद्धव ठाकरे यांनी केली.

उद्धव ठाकरे यांनी यावेळी कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्या शेतकरी कर्जमाफीवर केलेल्या विधानाचाही समाचार घेतला. कोकाटेंवरच मुळात फसवणुकीचा आरोप आहे. कोर्टाकडून आश्चर्यकारक निकाल लागल्यामुळे त्यांचे मंत्रिपद आणि आमदारकी वाचलेली आहे. ज्यांच्यावर फसवणुकीचा आरोपच आहे किंवा गुन्हा सिद्ध झालेला आहे. गुन्हा सिद्ध होऊन शिक्षा न झालेली ही कदाचित पहिली व्यक्ती असेल, असा टोला उद्धव ठाकरे यांनी कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांना लगावला.

## बिलासपूर-बिकानेर एक्सप्रेसला लागली आग







**उज्जैन** : रविवारी संध्याकाळी उज्जैनजवळील तराणा येथे बिलासपूर-बिकानेर एक्सप्रेस (२०८४६) ट्रेनला आग लागली. ट्रेनच्या एसएलआर (जनरेटर डब्यात) आग लागली. धूर निघत असताना गोंधळ उडाला. आगीनंतरचा एक व्हिडिओही समोर आला आहे. ज्यामध्ये काही लोक कोचची काच फोडून आणि पाणी ओतून आग विझवण्याचा प्रयत्न करत आहेत.

तथापि, काही वेळाने जळणारा डबा वेगळा करण्यात आला आणि ट्रेन रवाना करण्यात आली. तराणा रोड स्टेशन मास्तरांनी सांगितले की आग विझवण्यात आली आहे. कोणत्याही प्रवाशाला कुठल्याही प्रकारची हानी झालेली नाही.

आगीची माहिती मिळताच ग्रामस्थही घटनास्थळी पोहोचले. गावकरी मुकेश रावल यांनी सांगितले की, काली सिंध नदीवरील पुलावर असताना ट्रेनला आग लागली. यावेळी रेल्वे कर्मचाऱ्यांसह पाण्याचा आणि इतर मार्गांनी पॉवर कोचमधील आग विझवण्याचे प्रयत्न करण्यात आले.

रेल्वेचे पीआरओ खेमराज मीणा यांनी सांगितले की, ही ट्रेन बिकानेरहून बिलासपूरला जात होती. सायंकाळी ५:३० वाजताच्या सुमारास, तराणा रोड स्टेशनसमोर ट्रेनच्या पॉवर कोचला आग लागली.

यानंतर डबा ट्रेनपासून वेगळा करण्यात आला. यावेळी, तराणा येथून अग्निशमन दलाच्या गाड्यांना बोलावून आग आटोक्यात आणण्यात आली. ट्रेन तराणा स्टेशनवर थांबली होती. आग आटोक्यात आल्यानंतर उज्जैन रेल्वे स्थानकावरून पॉवर कोच मागवण्यात आला. यानंतर सायंकाळी ६:३२ वाजता ट्रेन भोपाळला रवाना करण्यात आली.

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड प्रिंटर्स
डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.
मो. 8087880274, 8956362639, 9270446603, 9405109103
डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)
- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशनचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर
अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ट कामासाठी अवश्यक संपर्क साधा.
Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०७ एप्रिल २०२५


## डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ प्रशासनाविरोधात आज स्वाभिमानी मुप्टाचे आंदोलन

**छत्रपती संभाजीनगर** : कोहिनुर महाविद्यालय खुलताबाद जि.छत्रपती संभाजीनगर येथे कार्यरत डॉ. शंकर अंभोरे यांची प्राचार्य पदाची मान्यता विद्यापीठ प्रशासनाने हेतूत: नियमबाह्यपणे काढून घेतली आहे. सदर मान्यता पूर्ववत करण्यासाठी स्वाभिमानी मुप्टा शिक्षक संघटनेसह विविध शिक्षक प्राध्यापक संघटना, विध्यार्थी संघटना व आंबेडकरवादी पक्ष संघटना सहभागी होणार आहेत. सदर आंदोलन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ मुख्य प्रवेशद्वार समोरील परिसरात होईल.जो पर्यंत मागणी मान्य होत नाही तो पर्यंत विविध प्रकारचे आंदोलने सुरूच राहणार असा इशारा स्वाभिमानी मुप्टाचे कार्याध्यक्ष डॉ किशोर साळवे,सचिव प्रा.विलास,पांडे, जिल्हा अध्यक्ष डॉ विजय बैसाणे, प्रा अनिल पांडे, डॉ. बाळासाहेब लिहिणार कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघांचे महासचिव देवानंद वानखडे, जिल्हा अध्यक्ष विलास जगताप आर.पी.आय. महाराष्ट्रचे मा.राजू साबळे, भारतीय दलित पँथर चे संजय जगताप, बहुजन नवक्रांती सेनाचे. श्यामभाऊ भारसाखळे, रिपब्लिकन सेनाचे प्रा सुनील वाकेकर, प्रहार संघटनेचे कुणाल राऊत, शिवसेना (उबाठा), रिपब्लिकन विद्यार्थी सेना सचिन निकम, अँड अतुल कांबळे, आंबेडकरवादी बहुजन विकास समितीचे दीपक निकाळजे, पँथर्स विध्यार्थी आघाडीचे गुणरत्न सोनावणे, परिवर्तनवादी चळवळीचे राहूल मकासारे, आदींनी कळविले आहे.

## राम नवमी निमित्ताने गीतरामायणाचे आयोजन




**छत्रपती संभाजीनगर** : रामनवमी चे औचित्य साधून राजेश मुंढे मित्र मंडळ व जीवन कला मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित “गीतरामायण” या कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. शिवराम प्रतिष्ठान, न्यू समर्थनगर येथे पार पडलेल्या या कार्यक्रमात रसिकांनी भक्तिमय वातावरणात गीत रामायणाची सुरेल झलक अनुभवली.कार्यक्रमात श्री. देवदत्त देशपांडे यांनी आपल्या सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली, तर साथसंगतीला सई बाराबोटे, मिलिंद डोलारे, निखिल प्रधान आणि स्वरित केचे यांनी उत्कृष्ट साथ दिली.या कार्यक्रमाचे आयोजक महेश अचिंतलवार व ह.भ.प. अच्युत महाराज कुलकर्णी, तसेच संयोजक राहूल संत व प्रशांत बाराबोटे यांनी उत्तम नियोजन केले.कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून श्री. राजेश मुंढे (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस) आणि श्री. गणेशराव जहागीरदार (अध्यक्ष, जीवन कला मंडळ) यांची उपस्थिती लाभली.कार्यक्रमाच्या शेवटी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते,ज्याचा सर्वांनी लाभ घेतला.“गीतरामायण” कार्यक्रमामुळे रामायणातील मूल्ये आणि संगीताची परंपरा नव्या पिढीकडे पोहचवण्याचा प्रयत्न यशस्वी ठरला, असे मत आयोजकांनी व्यक्त केले.

## कै. माधवराव (काका) पाटील यांची ९९ वी जयंती विविध ठिकाणी साजरी



**(मुरुम प्रतिनीधी)** : ग्रामीण भागातील गोरगरीब, होतकरु मुला-मुलींना शिक्षणाची सोय व्हावी या उद्येशाने शैक्षणिक संकुलन उभे करणारे, शेती उद्योगाला चालना देण्याकरिता विठ्ठलसाई साखर कारखान्याची उभारणी करणारे विठ्ठलसाई सहकारी साखर कारखान्याचे संस्थापक अध्यक्ष तथा नगर शिक्षण विकास मंडळाचे अध्यक्ष कै. माधवराव (काका) पाटील यांची ९९ वी जयंती मुरुम शहरात विविध ठिकाणी रविवारी (ता. ६) रोजी मोठया उत्साहाच्या वातावरणात साजरी करण्यात आली. प्रारंभी कै. माधवराव पाटील यांच्या समाधीस्थळी भाजपचे नेते बसवराज पाटील व जिल्हा बँकेचे अध्यक्ष तथा नगर शिक्षण विकास मंडळाचे अध्यक्ष बापूराव पाटील यांच्या हस्ते पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी माजी नगराध्यक्ष व्यंकटराव जाधव, बबनराव बनसोडे, रशिद शेख आदिंची प्रमुख उपस्थिती होती. श्री माधवराव पाटील महाविद्यालयाच्या प्रांगणातील कै. माधवराव पाटील यांच्या पुर्णाकृती पुतळ्यास भाजपचे नेते बसवराज पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी जिल्हा बँकेचे अध्यक्ष बापूराव पाटील, नगर शिक्षण विकास मंडळाचे सचिव व्यंकटराव जाधव, माजी जिल्हा परिषद सदस्य दिलीप भालेराव, उमरगा जनता बँकेचे व्हाईस चेअरमन अँड. व्ही. एस. आळंगे, कारखान्याचे संचालक अँड. संजय बिराजदार, श्रमजीवी संस्थेचे संचालक मल्लीनाथ दंडगे, प्राचार्य डॉ. दिलीप गरुड, प्राचार्य डॉ. अशोक सपाटे, कारखान्याचे कार्यकारी संचालक सुरेश गवसने, श्रीकांत बेंडकाळे, उपप्राचार्य चंद्रकांत बिराजदार, तात्यासाहेब शिंदे, उल्हास घुरेघुरे, राजशेखर कोरे आदिंची प्रमुख उपस्थिती होती. शहरातील कै. माधवराव पाटील सार्वजनिक वाचनालय, प्रतिभा निकेतन विद्यालय, मुरुम, कोथळी, भुसणी, प्रतिभा निकेतन इंग्लिश स्कूल व नूतन विद्यालय, माधवराव पाटील कॉलेज ऑफ फार्मसी, विठ्ठल साई सहकारी साखर कारखाना आदि ठिकाणी जयंती साजरी करण्यात आली.

## साडेचार वर्षांच्या चिमुकलीसमोरच वडिलांनी केला आईचा खून



**सोलापूर** : जिल्ह्यातील करमाळा तालुक्यातील कोर्टी गावात एक अत्यंत धक्कादायक आणि दु:खद घटना घडली आहे. युवराज लक्ष्मण शेरे (वय 31) याने पत्नी रूपाली युवराज शेरे (वय 25) हिचा गळा दाबून खून केला आणि त्यानंतर स्वत: गळफास घेऊन आत्महत्या केली असल्याची घटना घडली आहे. या घटनेने एकच खळबळ उडाली आहे. धक्कादायक बाब म्हणजे ही संपूर्ण घटना त्यांच्या साडेचार वर्षांच्या चिमुकलीसमोरच घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, युवराज काही दिवसांपासून मानसिक तणावात होता. तो सतत पत्नीशी वाद घालत असे आणि कुटुंबीयांशीही नीट संवाद करत नव्हता. मागील दोन महिन्यांपासून त्याचे वागणे बदलले होते. या मानसिक तणावातूनच त्याने टोकाचे पाऊल उचलल्याचे सांगितले जात आहे. विशेष म्हणजे, या दुर्दैवी घटनेवेळी त्यांची साडेचार महिन्यांची चिमुकली देखील घरात उपस्थित होती. या घटनेमुळे संपूर्ण गावात हळहळ व्यक्त होत असून, परिसरात एकच खळबळ उडाली आहे. पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

समोर आलेल्या माहितीनुसार, युवराज शेरे हा पत्नी, आई, वडील, भाऊ, भावजय व लहान मुलीसह कोर्टी येथील हुलगेवाडी रस्त्यावरील शेरे वस्ती येथे राहत होता. युवराज शेरे व त्यांची पत्नी रूपाली दोघेच घरी असताना युवराजने रूपालीचा गळा दाबून खून केला. आपल्या पत्नीचा खून केल्यानंतर युवराजला पश्चाताप झाला व त्यातून त्याने घरातील अँगलला गळफास घेऊन आत्महत्या केली असावी, असा अंदाज पोलिसांनी वर्तवला आहे.

तसेच घरातील इतर सदस्य सायंकाळी सहाच्या सुमारास घरी परतले. त्यावेळी घरात साडेचार वर्षांची चिमुकलीच्या रडण्याचा आवाज घरातून येत असल्याचे ऐकू आले. तेव्हा तेव्हा युवराजच्या वडिलांनी दरवाजा तोडून घरात प्रवेश केला तेव्हा त्यांना घरातील दृश्य पाहून धक्काच बसला. सून रूपाली मृत अवस्थेत पडली होती तर मुलगा युवराज लोखंडी अँगलला लटकलेला दिसल्यावर वडिलांच्या पायाखालची जमीनच सरकली. त्यांनी युवराजला खाली उतरवले आणि या घटनेची माहिती तातडीने पोलिसांना कळवली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केला. तसेच मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी सरकारी रुग्णालयात पाठवण्यात आला आहे. पोलिस निरीक्षक विनोद घुगे घटनेचा अधिक तपास करत आहेत.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०७ एप्रिल २०२५


## महानगरपालिका प्राथमिक व माध्यमिक विद्यालय चिकलठाणा शाळे मार्फत उत्कृष्ट कार्य करणाऱ्या शिक्षिकेचे गौरव समारंभ



मनपा शाळा चिकलठाणा शाळेच्या उपक्रम शील शिक्षिका श्रीमती भिंगोले मॅडम यांचे प्रवेश सोहळ्या दरम्यान उपायुक्त श्री.अंकुश जी पांढरे सर यांनी इंग्रजी भाषा संवाद या कौशल्याचे विशेष कौतुक केले त्याबद्दल मुख्याध्यापक श्री .शिंदे सर व सर्व शिक्षक वृंद यांचे मार्फत सत्कार करण्यात आला

## बीडची ऋचा कुलकर्णीने पहिल्याच प्रयत्नात मिळवले मोठे यश



**बीड :** महाराष्ट्र लोकसेवा आयोग आणि जेएमएफसी द्वारे घेण्यात आलेल्या दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग परीक्षेचा निकाल जाहीर झाला आहे. या परीक्षेत बीड जिल्ह्यातील ऋचा विठ्ठल कुलकर्णी हिने राज्यात प्रथम क्रमांक मिळवून उज्वल यश संपादन केले आहे. ऋचाने तिच्या पालकांच्या कष्टाचे चीज केले असून पालकांनाही मुलीचे यश पाहून आनंद गगनात मावेनासा झाला आहे.

ऋचाचे वडील हे पिग्मी एजंट म्हणून काम करतात, तर आई अंगणवाडीमध्ये शिक्षिका आहे. दोघांनी कष्टाने आपल्या मुलीचे शिक्षण पूर्ण केले. ऋचाने देखील आपल्या पालकांच्या कष्टाची जाणीव ठेवत मोठे यश मिळवले आहे. अत्यंत हालाखीच्या व कष्टाने मुलीचे शिक्षण पूर्ण केले आणि मुलीने त्याचे चीज करत यश मिळवल्याने वडील विठ्ठल कुलकर्णी यांना अश्रू अनावर झाल्याचे पाहायला मिळाले.

राज्यात प्रथम आल्यानंतर ऋचाने आपल्या भावना व्यक्त केल्या. एका वृत्तवाहिनीला मुलाखत देताना ऋचा म्हणाली, वडील पिग्मी एजंट असून आई अंगणवाडी शिक्षिका होती, तिने 2019 मध्ये ती सोडली होती. आई वडिलांची खूप मेहनत आहे यामध्ये, माझी मेहनत म्हणजेच अभ्यास 10 टक्के असून आई वडिलांचे श्रम आणि गुरुजनांचे आशीर्वाद 90 टक्के आहे. सुरुवातीला सांगितल्याप्रमाणे वडील पिग्मी एजंट आहेत, त्यांना 100 रुपयांना 2 रुपये कमिशन मिळते, त्यातून 15 हजार रुपयांचा खर्च भागवणे अवघड होते. वडील दोन ड्रेसवर राहिले पण आमच्या गरजा पुरवत राहिले, आईची पण तशीच मेहनत आहे, असे ऋचाने सांगितले.

पुढे बोलताना ऋचा कुलकर्णी म्हणाली, आई वडिलांच्या श्रमामुळे इथपर्यंत पोहोचले आहे, मुलींना शिक्षण देणे महत्त्वाचे असते. लग्न हे मुलीच्या आयुष्यातील शेवटचे ध्येय असत नाही. शिक्षण झाले की मुलीचे लग्न करायचे हा विचार बदलणे गरजेचे आहे. पदवी झाली तिचे लग्न करणे हा विचार बदलावा. पदवी झाल्यानंतर मुलगी तिच्या पायावर उभी राहिल्यास आपण महिला सशक्तीकरणाकडे जातो हे समजणे महत्त्वाचे आहे.

मुलीच्या यशावर बोलताना भावुक झालेले ऋचाचे वडील विठ्ठल कुलकर्णी म्हणाले, बीडच्या लोकांनी खूप सहकार्य केले. बीडच्या लोकांचे उपकार आहेत, त्याच्यामुळे आम्ही इथंपर्यंत पोहोचलो आहे. गेल्या 35 वर्षांपासून पिग्मी एजंट म्हणून काम केले. एक रुपयाची फसवणूक केली नाही. बीड शहरातील सगळ्या लोकांनी सहकार्य केले, यामुळे इथपर्यंत पोहोचलो. लेकराने कष्टाचे चीज केले, याचा आनंद वाटतो.

# मी लिहितो पण....

माझ्यासाठी नाही
प्रसिद्धीसाठी अजिबात नाही
मी लिहितो
समाजाच्या उत्थानासाठी

समाजातील अन्याय,अत्याचार
जातीयवाद,भ्रष्टाचार,असहिष्णुता
यावर सडकून टीका करतो
माणसाच्या जगण्यासाठी

लेखनाने माझी एक
ओळख निर्माण केली
लेखनासाठी मात्र
मी बेइमानी नाही केली

लिहित असताना मात्र
मी पर्वा नाही केली
समाजाला जिवंत ठेवण्यासाठी
कुणाच्या धमकीला भीक नाही घातली

माझे सत्य लिहिणे हे
अनेकांना खटकते
अनैतिकता पेरणा-यांच्या मात्र
उरात धडकी भरवते

माझे लेखन कुणाला बरे वाटण्यासाठी
कुणाची निंदानालस्ती करण्यासाठी नसते
अज्ञानांना जागे करण्यासाठी
अन् माजलेल्या धडा शिकविण्यासाठी असते

लिहिताना, बोलताना
माणसांनी प्रामाणिक असावं
आपल्याकडे पाहुन
तरूण पिढीनं तसं वागणं शिकावं

नको मला कुणाची
विनाकारण फुशारकीची,पुरस्काराची थाप
आपण लिहितो,बोलतो
तेव्हा उडाला पाहिजे थरकाप

मी लिहितो पण
कुणाच्या भावना दुखावण्यासाठी नाही
ज्यांनी हजारो साल अंधारात ठेवलं
त्या माणसांना उजेड दाखवण्यासाठी


**प्रा. डॉ. सतीश मस्के**
**पिंपळनेर ता.साक्री जि.धुळे**
**मो.9423397484**


# एकनाथ खडसे-गिरीश महाजन वादात गुणरत्न सदावर्तेंची उडी



**मुंबई :** राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार एकनाथ खडसे यांनी भाजपचे आमदार आणि मंत्री गिरीश महाजन यांच्याबाबत सनसनाटी आरोप केला आहे. गिरीश महाजन यांचे महिला आयएएस अधिकाऱ्याशी संबंध असल्याचे एकनाथ खडसे म्हणालेत. यासंदर्भात अमित शहा यांच्याकडे कॉल रेकॉर्ड असल्याचा दावा देखील एकनाथ खडसे यांनी केला आहे. एकनाथ खडसेंच्या या आरोपांमुळे राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे. त्यात आता वकील गुणरत्न सदावर्ते यांनी या प्रकरणात उडी घेतली आहे.

गुणरत्न सदावर्ते यांनी एकनाथ खडसे यांनी गिरीश महाजन यांची माफी मागावी अन्यथा राष्ट्रीय महिला आयोगाकडे तक्रार करणार, असा इशारा दिला आहे. गुणरत्न सदावर्ते म्हणाले, तुम्ही गिरीश महाजन यांना बदनाम करू नका. एकनाथ खडसे तुम्ही माफी मांगा. जर माफी नाही मागितली तर राष्ट्रीय महिला आयोगाकडे तक्रार करणार. हे नीच वागणे झाले, सौ चुहे खाकर बिल्ली हज को चली, त्यांची वैचारिक दिवाळखोरी झाली आहे. राज्यपालांकडे 100 कोटीच्या घोटाळ्यासंदर्भात गुन्हा दाखल करण्यासाठी केस पेंडींग आहेत. त्यांचा खोटा बुरखा फाडला जाईल, असे सदावर्ते म्हणाले आहेत.

एकनाथ खडसे म्हणाले की, गगनभेदीचे पत्रकार अनिल थत्ते यांनी आपली एक क्लिप प्रकाशित केली. त्यात असे म्हटले आहे की, गिरीश महाजन यांच्या 'रंगला रात्री अशा', त्यात त्यांनी डिटेल सांगितले आहे की, गिरीश महाजन यांचे एका महिला आयएएस अधिकाऱ्यासोबत संबंध आहेत. तिचे नाव मला माहित आहे. पण ते सांगणे उचित होणार नाही, असेही त्यांनी म्हटले आहे.

गेल्या अनेक वर्षापासून वारंवार घाणेरडी भाषा करायची. काही सिद्ध करता येत नाही. काहीतरी चरित्रहणन करायचं, याशिवाय त्यांच्याकडे दुसरं काही राहिलेले नाही. त्यांनी एक पुरावा दाखवावा, मी सक्रिय राजकारणातून बाहेर पडेन. अमित शहा यांना काय पुरावा दाखवता? तुमच्याकडे पुरावा असेल तर तो लोकांना दाखवा. यांना दिले, त्यांनी दिले माझ्या मोबाईलमध्ये होते, डिलिट झाले, मोबाईल हरवला हे खोटं बोलताना लाज वाटत नाही का? माझे आव्हान आहे त्यांनी एक पुरावा दाखवावा. माझा अंत बघू नका, असा इशाराही महाजन यांनी खडसेंना दिला.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०७ एप्रिल २०२५


## विद्यार्थांनी नविन कौशल्य आत्मसात करावीत - मा. आ. राहुलभाउ बोंद्रे




**चिखली (महेश मुंढे) :** विद्यार्थ्यांनी शास्त्राचे ( AI ) सामर्थ्य ओळखून सखोल अभ्यास करावा व देशाच्या उन्नतीसाठी उल्लेखनीय सहभाग घ्यावा. कौशल्यपूर्ण विद्यार्थ्यांना उज्वल भविष्यातील मोठी संधी असून नवनवीन कौशल्य आत्मसात करणे काळाची गरज असल्याचे प्रतिपादन परमहंस रामकृष्ण मौनीबाबा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा.आ राहुलभाउ बोंद्रे यांनी केले. स्थानिक अनराधा अभियांत्रिकी महाविद्यालय चिखली येथे "ग्रीन टेक्नॉलॉजी व A I पाथवे टू सस्टेनेबल डेव्हलपमेंट" या विषयावर एक दिवसीय राष्ट्रीय परिसंवाद संपन्न झाला. या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष परमहंस रामकृष्ण मौनीबाबा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. आ.राहुलभाउ बोंद्रे होते तर प्रमुख पाहुणे कि-नोट स्पिकर डॉ. संदिप देशमुख BITS हैद्राबाद , संस्थेचे कोषाध्यक्ष सिध्देश्वर वानेरे, कार्यकारी संचालक डॉ. रविंद्र इंगळे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अरूण नन्हई, डॉ. प्रविण चौधरी, डॉ. के. एन. तायडे, डॉ. संदिप पाटील आदी उपस्थित होते.पुढे बोलताना राहुलभाउ म्हणाले की, A I या विषयाने जगभरात हाहाकार उडविला आहे. परंतु याच्या दुषपरिणामाचा विचार न करता A. I चे ज्ञान विद्यार्थ्यांनी आत्मसात केले पाहिजेत अन्यथा आपण स्पर्धेतून बाहेर फेकल्या जाऊ. आज चाट जिपीटी, डिप सिक ग्रॉक यांनी जगाची झोप उडविली आहे. ऐकेकाळी संपर्क साधण्यासाठी टेलीफोन च्या माध्यमातून ट्रंक कॉल बुक करावा लागत होता परंतू आज संपूर्ण जग मोबाईल च्या माध्यमातून आपल्या मुठीत आले आहे. या बदलासाठी खुप वेळ गेला परंतु आत्ताच्या तंत्रज्ञान बदलाचा वेग प्रचंड असल्याचे त्यांनी सांगितले.प्रमुख पाहुणे किनॉट स्पिकर डॉ. संदिप देशमुख यांनी सांगितले की आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या भविष्यातील क्षमता अनंत आहे. हे तंत्रज्ञान आपल्याला नवे मार्ग, नवीन उपाय, आणि नव्या संधी देत आहे. परंतु, त्याचबरोबर हे महत्वाचं आहे की आपण याच्या नैतिक, सामाजिक आणि सुरक्षा बाबींकडे लक्ष देऊन याचा उपयोग करावा. AI एक साधन आहे, आणि त्याचा वापर योग्य रीतीने केला तर तो मानवतेला मोठा फायदा देऊ शकतो. तसेच अनुराधा अभियांत्रिकीत शिक्षणासोबतच जिवनमुल्य रूजविण्याचे काम करत आहे. कर्मयोगी तात्यासाहेबांनी अनेक विद्यार्थ्यांचे जिवनमान उंचवण्याचे काम केले असून त्यांचा शैक्षणिक, अध्यात्मिक, सामाजिक कुटुंब वत्सल वारसा संस्थेचे अध्यक्ष मा.आ राहुलभाउ बोंद्रे चालवित असल्याचे भावपूर्ण गौरवोद्वार त्यांनी प्रकट केले.प्रास्ताविकपर बोलताना प्राचार्य डॉ.अरूण नन्हई म्हणाले की , सेमीकंडक्टरच्या शोधामुळे आज अनेक संशोधन केल्या जात असून आजपर्यंत संशोधनाचे अनेक फायदे व दुष्परिणाम आपण बघत आहेत. ज्यामधे सर्वप्रकारचे प्रदुषण प्रामुख्याने उल्लेखीत करता येईल, परंतु आता ग्रीन टेक्नॉलॉजी ,ग्रिन कॉम्पुटींग यासारख्या संकल्पनामुळे शाश्वत विकास शक्य होईल. जिवनात प्रत्येक क्षेत्रात वेगाने विकास साधण्यासाठी A.I ची मदत होणार असल्याचे त्यांनी सांगितले. सदर परिसंवादात १०७ संशोधन लेख सादर केले तसेच १२५ विद्यार्थ्यांनी पोस्ट्स प्रेझेंटेशन मधे सहभाग नोंदविला.यावेळेस प्रा. संदिप पाटील, भुजबळ नॉलेज सिटी यांच्या हस्ते पेपर प्रेझेंटेशन मधे पहिले बक्षीस 3000 रू. रोख अभिजीत वानखेडे, प्रणय शेळके, कृष्णा तेलंग्रे, दुसरे बक्षीस 2000 रू रोख पल्लवी मगर , नागेश मापारी तर तृतीय बक्षीस 1000 रू. रोख आदित्य देशमाने, हृषीकेष मुंडलिक, ओमकार , एम ए. पाटील, अतुल कंकाळ, मुकुंद कुमार यांना देण्यात आले तर पोस्टर प्रेझेंटेशन मधे पहिले बक्षीस 1000 रू. रोख कल्याणी गव्हाड, आकाश डुकरे तर दुसरे वैष्णवी जासुदकर ,शिवप्रसाद ठेंग, यश अपार तर तृतीय बक्षीस यश कर्हाडे ,कृष्णा चव्हाण यांना वितरीत केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचलन जे. के. शिंदे यांनी तर आभार डॉ. प्रशांत गावंडे यांनी केले.

## नागपूरमधील मोठ्या सेक्स रॅकेटचा पर्दाफाश

**नागपूर :** नागपूरमध्ये एका ओयो हॉटेलमध्ये तरुणींकडून देहव्यवसाय करून घेतला जात असल्याचे समोर आले आहे. या घटनेने नागपूर शहरात एकच खळबळ उडाली आहे. या हॉटेलमध्ये हुक्का सुद्धा ग्राहकांना पुरवला जात असल्याची माहिती समोर आली आहे. पोलिसांना या संबंधीची माहिती मिळताच या हॉटेलवर पोलिसांनी धाड टाकली. पोलिसांनी काही आरोपींना देखील यावेळी अटक केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, नागपूर येथील गिट्टीखदान भागात एका हॉटेलमध्ये तरुणींकडून वेश्याव्यवसाय करून घेतला जात होता. तसेच या हॉटेलमध्ये ग्राहकांना हुक्काची देखील सुविधा पुरवली जात होती. हा प्रकार उघडकीस आल्यावर पोलिसांनी या हॉटेलवर धाड टाकत कारवाई केली आहे. यातून नागपूरमध्ये मोठे सेक्स रॅकेट सुरू असल्याचे समोर आले आहे. पोलिसांनी केलेल्या कारवाईत काही तरुणींची सुटका करण्यात आली आहे, तसेच काही आरोपींना अटक देखील करण्यात आली आहे.

नागपूर शहरातील गिट्टीखदान भागात एक ओयो हॉटेल आहे. या हॉटेलमध्ये आर्थिक फायद्यासाठी तरुणींकडून वेश्याव्यवसाय करून घेतला जात होता. पोलिसांना याबाबत माहिती मिळाली असता त्यांनी तातडीने या हॉटेलवर धाड टाकत कारवाई केली. या कारवाईत एकूण दोन आरोपींना नागपूर गुन्हे शाखेच्या सामाजिक सुरक्षा विभागाने अटक केली आहे. कारवाईत दोन आरोपींनी मात्र पळ काढला असून पोलिस त्यांचा शोध घेत आहेत. चेतन आकोले आणि युगांत दुर्गे असे अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. यावेळी काही तरुणींची देखील सुटका करण्यात आली आहे.

पोलिसांनी एका हॉटेलवर छापा टाकल्यानंतर तेथे चार पीडित मुलींकडून जबरदस्तीने देहविक्रीचा व्यवसाय करून घेतला जात असल्याचा धक्कादायक प्रकार उघड झाला. पोलिसांनी तत्काळ कारवाई करत या चार मुलींची आरोपींच्या ताब्यातून सुटका केली. सदर हॉटेलमध्ये ग्राहकांना हुक्का पिण्यासाठीही पुरवठा केला जात असल्याचे तपासात निष्पन्न झाले. पोलिसांनी घटनास्थळावरून दोन मोबाईल फोन, हुक्का पॉट आणि इतर साहित्य असा एकूण 86 हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. दरम्यान, या प्रकरणातील दोन आरोपी पळून गेले असून, पोलिस त्यांचा कसून शोध घेत आहेत. तसेच या रॅकेटमध्ये आणखी कोण-कौन सहभागी आहेत, याचा तपासही पोलिस करत आहेत.






## औरंगजेबाची कबर असलेल्या खुलताबादचे नामांतर होणार



**छत्रपती संभाजीनगर :** औरंगजेबाची कबर असलेले खुलताबादचे नाव रत्नपूर होते. औरंगजेबाने ते बदलून खुलताबाद केले. देवगिरीचे नाव बदलून दौलताबाद केले. खुलताबादचे नामांतर होणार असून दौलताबादचे देखील नामांतर होणार आहे,असे पालकमंत्री संजय शिरसाट यांनी एका मराठी वृत्त पत्राला बोलताना म्हटले आहे.

संजय शिरसाट म्हणाले की, औरंगजेबाने त्याच्या काळात जे काही कारनामे केले आहेत त्यामुळे अनेक शहरांची नावे बदलली. धाराशिवचे नाव बदलले गेले. नगरचे नाव बदलले गेले. हे सगळे 'बाद' 'बाद' आहे ना त्यांची नावे बदलण्याची प्रोसेस आम्ही करत आहोत. औरंगजेबाची कबर हटवावी, अशी मागणी हिंदुत्ववादी संघटनांकडून करण्यात येत आहे. त्यावरून महाराष्ट्रात राजकारण पेटले. नागपूरमध्ये दंगल देखील झाली. यानंतर आता औरंगजेबांची कबर असणाऱ्या तालुक्याचे नाव बदलणार असे पालकमंत्री शिरसाट यांनी म्हटले आहे.